# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

## प्रेसनोट

दिनांक १०/०१/२०२२

**" सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने अवैधरित्या शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची मोठ्या प्रमाणात गोडावुनमध्ये साठवणुक करुन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई केलेबाबत."**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक ०९/०१/२०२२ रोजी महाळुंगे (ईं) पोलीस चौकीच्या हद्दीत अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात साठवणुक करुन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०९/०१/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी महाळुंगे (ईं) पोलीस चौकी हद्दीतील ठाकरवाडी एचपी पेट्रोल पंप शेजारी इसम नामे धर्माराम चौधरी हा रामचंद्र काळे यांचे गोडाऊनमध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची साठवणुक करुन त्याची महाळुंगे परिसरामध्ये स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी विक्री करीत आहे. अशी गुप्तबातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी महाळुंगे (ईं) पोलीस चौकी हद्दीत १०:१५ वा चे सुमारास सापळा रचुन अतिशय शिताफीने छापा टाकुन खालील मुद्देमाल आरोपीच्या ताब्यात मिळुन आला त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) २,९५,६९९/- रु किं चा प्रतिबंधीत तंबाखूजन्य गुटखा.

---

**असा एकुण २,९५,६९९/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) धर्माराम मयाराम चौधरी वय ४५ वर्षे रा. एचपी ठाकरवाडी महाळुंगे (ईं) ता. खेड जि. पुणे **तसेच पाहिजे आरोपी नामे** २) ओमजी बिष्णोई वय ४५ वर्षे रा. खालुंब्र ता. खेड जि. पुणे ३) रामचंद्र काळे वय ४५ वर्षे रा. ठाकरवस्ती, महाळुंगे (ईं) ता. खेड जि. पुणे यांचेविरुध्द महाळुंगे (ईं) पोलीस चौकी येथे गुरनं ४४/२०२२ भादंवि कलम ३२८, २७२, २७३, १८८, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास महाळुंगे (ईं) पोलीस चौकी करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. काकासाहेब डोळे, मा. सहा. पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर, पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि डॉ. अशोक डोंगरे, पोउपनि श्री. धैर्यशिल सोळंके पोलीस अंमलदार किशोर पढेर, भगवंता मुठे, मारुती करचुंडे, राजेश कोकाटे, संगिता जाधव, अतुल लोखंडे, सोनाली माने यांनी केली आहे.


महिला कक्ष
PUMA
Jogging Friends